

ई-पुण्यनगरी दि.05/05/2025



# नांदेड परिक्षेत्र कार्यालय राज्यात द्विती

## शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम; महाराष्ट्र दिनी पालकमंत्र्यांच्या हस्ते





**नांदेड / आनंद कुलकर्णी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. ७ जानेवारी रोजी सर्व शासकीय कार्यालयांना, कार्यालयीन सुधारणा करण्यासाठी, १०० दिवसांचा सात कलमी सुधारणा कार्यक्रम आखून दिला होता. या विशेष मोहिमेत नांदेड परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात द्वितीय येण्याचा मान मिळवला आहे. महाराष्ट्र दिनी दि. १ मे रोजी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांचा गौरव करण्यात आला. यावेळी माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह अधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमांतर्गत, कार्यालयासाठी संकेतस्थळ, कार्यालयीन सुधारणा, नागरिकांसाठी पुरवण्यात येणाऱ्या सेवांचे सुलभिकरण, जुन्या अभिलेखांचे निंदनीकरण व निर्लेखन, कालबाह्य वस्तू व वाहनांची विल्हेवाट, कार्यालयाने राबविलेल्या नाविन्यपूर्ण योजना इत्यादी विषयांवर कामकाज करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. उपरोक्त कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी ठरवून दिलेली शंभर दिवसांची मुदत दि. १६ एप्रिल रोजी संपल्यानंतर, नांदेड परीक्षेत्रीय कार्यालयाने केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन प्रथमतः पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात येऊन, त्यातून ३ परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक, उपमहानिरीक्षक कार्यालयांची निवड करण्यात आली होती. यात, नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची देखील निवड करण्यात आली होती.

दि. २४ एप्रिल रोजी भारतीय गुणवत्ता परिषद (Quality Council of India) यांनी नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला होता. परिक्षेत्रीय कार्यालयाने केलेल्या कार्यालयीन सुधारणा, परिक्षेत्रीय कार्यालयापासून थेट पोलीस ठाण्यांपर्यंत सुरू केलेली ई टपाल व्यवस्था, गुन्हे अभिलेखांचे संगणकीकरण करून, तपासावर देखरेख ठेवण्यासाठी सुरू केलेली Eagle Eye : Crime Investigation monitoring ही




प्रणाली, विविध प्रकरणांत नागरि
सेवा देण्यासाठी सुरू केलेली क
मोहीम, ग्राम पातळीवर नागरिकां
सुरू केलेली **(पान २ वर..)**

> 
>
> भारतीय गुणवत्ता परिषदेने महाराष्ट्र दिनी यासंबंधीचा निकाल घोषित केला असून त्यातून, राज्यातील सर्व पोलीस परिक्षेत्रांतून द्वितीय येण्याचा मान नांदेड परिक्षेत्र कार्यालयास मिळाला आहे. कार्यालयातील पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांनी अहोरात्र घेतलेल्या परिश्रमामुळेच सदरचे यश शक्य झाले असून, या यशात त्यांचे सोबतच परीक्षेत्रातील प्रत्येक अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा वाटा आहे.
>
> **- शहाजी उमाप, पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र.**